# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचेकार्यालय

रामनगरसृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे

दुरध्वनीक्र. ०२२-२९४५१००१

E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्रमांक - ११६/२०२५ दिनांक १२/०३/२०२५

## प्रेसनोट

**लहान मुलांच्या मदतीने लग्न समारंभात चोरी करणा-या मध्य प्रदेश राज्य राजगढ जिल्यातील आंतरराज्यीय टोळीचे आरोपीतास अटक करुन मुद्देमाल हस्तगत करण्यात- बोळींज पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकास यश**

---------------------------

दिनांक २०/०२/२०२५ रोजी रात्री ०९.४५ वाजताच्या सुमारास विरार पश्चिम येथील ओल्ड विवा कॉलेजच्या पाठीमागील मैदानावर फिर्यादी नामे श्रीमती मिनल रामकांत पाटील वय.५२ वर्षे, रा. मनवेलपाडा, विरार पुर्व यांच्या मुलीचा लग्न सोहळा चालु असतांना वधु व वरास नातेवाईकांकडुन शुभेच्छांच्या स्वरुपात देण्यात येणारे पैशांचे पाकीट (८ लाख रुपये रोख) व ३ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने एका सुटकेस मध्ये लग्नाचे स्टेजवर ठेवलेले असतांना कोणीतरी अज्ञात इसमांने चोरी करुन नेला म्हणुन फिर्यादी यांचे तक्रारीवरुन बोळींज पोलीस ठाणे गु.रजि.नं. ४८/२०२५ भा.न्या.सं.कलम ३०३(२), ६१(२) प्रमाणे नोंद करण्यात आला आहे.

नमुद गुन्हा अज्ञात आरोपीताने केला असल्याने तो उघड होण्याकरीता मा.वरीष्ठांना गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांना सुचना दिल्या. त्याप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचे घटनास्थळी भेट दिली असता घटनास्थळी सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध नसतांना लग्न समारंभ ठिकाणाचे बाहेरील व आसपासचे परिसरातील सीसीटीव्ही फुटेज व गोपनीय बातमीदाराच्या माहिती वरुन सदरचा गुन्हा भारताचे विविध राज्यांत लग्न समारंभात चोरी करणा-या मध्य प्रदेश राज्य जिल्हा राजगढ येथील कडीया, गुलखेडी व हुलखेडी या गावांतील आंतरराज्यीय टोळीने एका अल्पवयीन मुलाचे मदतीने केला असल्याचे निष्पन्न झाल्याने तात्काळ एक पथक बोडा पोलीस ठाणे जि.राजगढ मध्य प्रदेश राज्य येथे रवाना करुन स्थानिक पोलीसांचे मदतीने सतत ११ दिवस तपास करुन गुन्हयातील एक आरोपी विकासकुमार रामजीलाल सिसोदिया (सासी) वय.३४ वर्षे यास अटक करुन गुन्हयात चोरी केलेल्या मुद्देमालपैकी ७,९०,०००/- रुपये रोख रक्कम हस्तगत करण्यात आली आहे. नमुद गुन्हयातील उर्वरित आरोपींचा शोध घेत असुन उर्वरित मुद्देमाल हस्तगत करीत आहोत.

सदरची कामगिरी मा. श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, मा. श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, मि.भा.वि.पोलीस आयुक्तालय, मा. श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०३, विरार, मा. श्री. विजय लगारे, सहाय्यक पोलीस आयुक्त, नालासोपारा विभाग यांचे मार्गदर्शनाखाली बोळींज पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. प्रकाश कावळे, पोलीस निरीक्षक, श्री. प्रकाश सावंत

(गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोउपनि/किरण वंजारी, पोउपनि/विष्णु वाघमोडे, स.फौ.जनार्दन मते, पोहवा/किशोर धनु, पो.अमं.संदिप शेळके, रोशन पुरकर, प्रफुल्ल सरगर, सुखराम गडाख, तांत्रिक मदत पोहवा/नामदेव ढोणे पोअं/सोहेल शेख नेम. परिमंडळ ०३ विरार कार्यालय यांनी केलेली आहे.

**मॅरेज हॉल चालक मालक व नागरीकांकरीता विशेष सुचना :-**

सध्या लग्न सराईचे दिवस सुरु असुन आपण आपले नातेवाईक व आप्तेष्टांचे लग्न समारंभाचे वेळी वधु व वरास देण्यात येणारे मुल्यवान दागिने व रोख रक्कम चोरी होणार नाही याची दक्षता घेणेबाबत मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालयाकडुन आव्हान करण्यात येत आहे.

----------------oo-----------------------